# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 03/09/2014 (का.प.क्र.06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

बुधवार दिनांक 03 सप्टेंबर 2014 रोजी (का.प.क्र .06) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.10 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे, भाप्रसे नगरसचिव श्री.प्रमोद का.खोब्रागडे व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
09. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
10. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
11. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
12. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
13. स.स.श्रीमती परवीन कैसर खान
14. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

मा.सभापती :नवीन अधिकारी या महापालिकेत रूजू झालेले आहे त्यांनी त्यांचा परिचय करून द्यावा.

यावेळी नवनियुक्त मा.अति.आयुक्त श्री. रमेश पवार व उपआयुक्त म्हणून श्री.बी.एल जाधव, डॉ.आशिष पवार रूजू झालेले आहे त्यांनी त्यांचा परिचय करून दिला.

श्री.त्रिंबक तुपे :तीन नवीन अधिकारी या मनपामध्ये रूजू झाले.आणि मा.आयुक्तांची या सभेला उपस्थिती आहे.त्यांची नागपूर येथे बदली झाल्याची बातमी ऐकली ते आज कार्यमुक्त होणार असे कळले. त्यांनी या महापालिकेत 18 महिणे महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नसतांना धुरा सांभाळली. सर्व गोष्टीवर मात करून एक चांगले नियोजन करून विकास कामास गती दिली.शहरातील मुख्य रस्त्याचे काम होत आहे. संमातरचा प्रश्न सुटणार आहे ,व्हाईट टॅपींग रस्ते होत आहे.मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे यांचेकडे बदली झाल्ल्या ठिकाणी चांगले मोठे काम असणार आहे. सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :नवीन तीन अधिकारी कार्यरत झाले त्यांचे या महापालिकेत स्वागतच आहे.मा.आयुक्त यांची बदली झाल्याचे ऐकले गेल्या 18 महिण्यापासून मा.आयुक्त डॉ.कांबळे साहेब येथे कार्यरत होते. त्या काळात त्यांनी चागले काम केले. सर्व लोकप्रतिनिधी,व्यापारी,नगरसेवक ,नागरीक यांना एकत्रितपणे घेवुन विकास कामास

नियोजन बध्द चालना दिली.त्यात सिव्हरेज योजना,समातंर लाईन, कत्तलखाना आधुनिकीकरण करणे ही कामे व्यवस्थीत हाताळून त्याची आवश्यकता आहे म्हणून मार्गी लावली. त्यामूळे मा.आयुक्त यांचे मनपुर्वक अभिनंदन करतो. शहरातील रस्त्याची नेहमीच दुर्दशा असायची खड्डे दिसायचे. ही परीस्थिती नेहमीच येणार नाही म्हणून त्यावर एकदाच तोडगा म्हणून त्यांनी व्हॉईट टॅपींग रस्ते करण्याचा निर्णय घेतला सध्या व्हाइट टॅपींग रस्ते होत आहे. पुढे अशा पध्दतीने रस्त्याची कामे होत रहावी 100 कोटी ऐवजी 50 कोटीचे रस्ते दरवर्षी व्हाईट टॅपींगचे केल्यास 8-10 वर्षात रस्ते डांगरीकरण करायचे हा विषय संपलेला असेल.आता महापालिका ड वर्गातून क वर्गात गेलेली आहे. यामूळे निश्चित पणे शासनाकडील मोठा निधी या मनपास मिळेल व नक्कीच फायदा होणार आहे.याकरीता डॉ.कांबळे साहेब यांचे प्रयत्न मोलाचे ठरले.सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करावे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :मा.आयुक्तांची बदली झाली येथून कार्यमुक्त होणार वाईटही तेवढेच वाटते. डॉ.हर्षदिप कांबळे यांनी या मनपामध्ये चांगले काम केले त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करते. माझ्या वार्डातील स्पील ओव्हरचे 80 लक्षचे काम बजेट मधून वगळण्यात आले आहे. ते काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री.मीर हिदायत अली :तीन नवीन अधिकारी रूजू झाले त्यांचे अभिनंदन करतो. गेल्या 18 महिण्यात मा.आयुक्त डॉ.कांबळे साहेब यांनी चांगले काम केलेले आहे. व्हाईट टॅपींग रस्ते ड्रेनेज लाईन तसेच शहरातील धार्मीक स्थळा बाबत मा.न्यायालयाचे आदेशाची अमलबजावणी करून लॉ ॲण्ड ऑर्डर न घेता सर्व धर्माच्या घटकातील लोकांना एकत्रित बोलवून हा प्रश्न सोडविला व रस्त्याची कामे पुढे नेली. या बरोबरच दर वेळेस 40 ते 41 कोटी मालमत्ता कर वसुली होत असे,परंतु या वर्षी सर्व नियोजन करून मा.आयुक्त यांनी 81-85 कोटी मालमत्ता कर वसुल केला.तसेच महापालिकेच्या प्रत्येक शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा त्यांनी कटाक्षाने प्रयत्न केलेला आहे.या वर्षी 10वीचा निकाल चांगला लागलेला आहे शैक्षणिक दर्जा सुधारण्या बरोबरच चांगल्या प्रकारे विकास कामे ही केल्याबध्दल सभागृहाच्या वतीने मा.आयुक्त यांचे अभिनंदन करावे.

श्री.संजय चौधरी :मा.आयुक्त यांनी चांगले काम केल्याबध्दल अभिनंदनाचा जो ठराव ठेवला त्यास अनुमोदन आहे. या शहरातील खड्डे संदर्भात वेगवेगळया अनेक प्रकारच्या बातम्या येत असे त्यावर कायमचा पर्याय म्हणून मा.आयुक्त यांनी व्हाईट टॅपींग रस्ते करण्याचे नियोजन केले.मनपाच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यात मोठा सहभाग मा.आयुक्तांचा आहे.90-95 टक्के गुण घेवून इयत्ता 10 वी मध्ये या वर्षी विद्यार्थी उत्तीर्ण झाले.याचे संपूर्ण श्रेय मा.आयुक्त यांना जातात. या बरोबर मा.आयुक्त यांनी शाळेचा शैक्षणिक तपासणी तसेच गुंठेवारी भागातील 5-5 लक्षच्या विकास कामाच्या संचिका प्रलबिंत आहे. त्या संचिका जाता जाता मंजूर करावी अशी अपेक्षा करतो.

श्री.त्रिंबक तुपे :सफाई कर्मचारी यांना दुसरा व चौथा शनिवार तसेच सार्वत्रिक सुट्टीच्या दिवशीचा मोबदला मिळालेला नाही तसेच सिडको व इतर उद्यानमध्ये काम करणारे कर्मचारी यांना अनेक दिवसापासून वेतन दिलेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :महापालिकेकडे सिडको हस्तांतर झाले,तेंव्हापासून अनेक कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसवर उद्यान मध्ये रोजंदारीवर काम करतात. त्यांना वेळेवर मासीक वेतन दिले जात नाही. या बाबत मा.आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :या बाबत टेंडर प्रोसेस करून कार्यवाही करावी लागेल.

मा.सभापती :उद्यान मध्ये काम करणारे कर्मचारी यांना वेतन देणे बाबत कार्यवाही करावी.

श्रीमती फिरदोस फातेमा खान :मा.आयुक्ताचे अभिनंदन करते, तसेच नवीन तीन अधिकारी या मनपात रूजू झाले त्यांचे अभिनंदन,मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे यांनी शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा 100 टक्के प्रयत्न केलेला आहे. तसेच 10 वी मध्ये जे विद्यार्थी चांगले गुण घेवून उर्त्तीण होतील. त्यांचेसाठी जी बक्षीस योजना ठेवली, त्यामुळे या वर्षी महापालिका शाळेतील 10वीचा निकाल चांगला लागलेला आहे. स्थायी समितीने जी स्पील ओव्हरची कामे मंजूर केली आहे ती कामे व्हावीत अशी अपेक्षा आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :डॉ.हर्षदिप कांबळे यांनी गेल्या 18 महिण्याच्या कार्यकाळात या महापालिकेत जे काम केले ते कौतुकास्पद आहे.पुढील काळातही अशा प्रकारे कामे होत रहावी अशी अपेक्षा करतो. जो ठराव ठेवला त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.रवि कावडे :मा.आयुक्त यांचे अभिनंदनाचा ठराव ठेवला त्यास अनुमोदन आहे. 18 महिण्याच्या कार्यकाळात रस्ते,समांतर जलवाहिनी, ड्रेनेज योजना घरकुल योजना राबविण्याचे चांगले काम केले गरीबांना घरे दिली. राजीव गांधी आवास योजना नुसार रस्त्याचे जागा बांधीत झालेल्यांना घरे व निधी उपलब्ध करून दिला दारिद्रय रेषेखालील लोकांना 10 टक्के रक्कम भरून घर मिळवून दिले.चांगले काम केल्याबध्दल धन्यवाद देतो.अभिनंदनाचा जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.अनिल जैस्वाल :मा.आयुक्त यांनी चांगले रस्ते केले पुढेही असेच काम होत रहावे. मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे यांना पुढील कामाच्या वाटचालीसाठी माझ्या सुभेच्छा.

श्री.जगदीश सिध्द :मा.आयुक्त यांनी त्यांची कार्यकिर्द नावारूपाने गाजवली. मनात जे येईल जे त्यांना पटेल, तेच त्यांनी चांगले काम केले.आर्थीक परस्थिती चांगली नसतांना महापालिकेची विकास कामाची घडी त्यांनी चांगली बसवली.ती घडी सतत टिकून रहावी अशी अपेक्षा आहे. महापालिकेतील 1124 कर्मचा-यांचा प्रश्न मोठा होता. तो प्रलबींत ठेवू नये.हे कर्मचारी आपल्या निर्णयाच्या आशेवर आहे.1124 कर्मचारी भरतीतील 262 कर्मचा-यांच्या सेवापुस्तक दिले. तसेच 70-80 कर्मचा-यांच्या संचिका निकाली काढलेल्या आहे. या कर्मचा-यांच्या कायमस्वरूपी सेवेचे आदेश काढावे.त्यानंतरच येथून कार्यमुक्त व्हाल अशी अपेक्षा करतो. मा.आयुक्त यांना पुढील कामासाठी सुभेच्छा. मा.आयुक्त यांना पदोन्नती मिळाली मोठे काम करण्याची जबाबदारी दिलेली आहे ही चांगली बाब आहे. या सभागृहाच्या वतीने माझ्या पक्षाच्या वतीने मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो.

श्री.अनिल मकरिये :अनेक भागातील व्हाईट टॅपींग रस्ते होत आहे. माझे वार्डातील कोणतेही काम मा.आयुक्त यांनी थांबविले नाही.जे आवश्यक आहे,होते ते काम त्यांनी केले.गेल्या 18 महिण्याच्या कार्यकाळात चांगले काम केल्याबध्दल सर्वाच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.सभापती :मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे यांची नागपूर येथे बदली झाली गेल्या दीड वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी या महापालिकेत 3-4 योजनेच्या कामकाज करून मार्गी लावले. त्यात समांतर लाईन, भुमिगत गटार योजना ही 40 वर्षापासूनची जुनी आहे. ती

नवीन करण्याचा प्रश्न मार्गी लावला अनेक रस्ते व्हाईट टॅपींगचे करण्याचा निर्णय घेतला क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता 75 टक्के पुर्ण झालेला आहे. पुढेही अशाच पध्दतीने कामे चालू रहावीत.उशीराका होईना अनेक कामांना गती दिली.प्रत्येक वार्डात कामे होतील. या दृष्टीने ज्या संचिका प्रलंबीत असतील त्यास मंजूरी दयावी. स.सदस्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला त्यानुसार मा.आयुक्त यांचे सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात येतो.

यावेळी मा.सभापती यांनी मा.आयुक्त डॉ.हर्षदिप कांबळे साहेब यांचा सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

श्री.त्रिंबक तुपे :मा.आयुक्तांनी केलेल्या कामा बाबत त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी त्यांचे केलेल्या विकास कामाबाबतच्या भावना व्यक्त कराव्यात.

मा.आयुक्त : नवीन नियुक्त झालेले अति.आयुक्त, तीन उपआयुक्त यांचे अभिनंदन. तसेच गेल्या दीड वर्षाच्या काळात सर्व अधिकारी कर्मचारी यांचे मला जे सहकार्य लाभले त्याबध्दल सर्वांचे अभिनंदन करतो.ब-याच दिवसापासून माझ्या बदलीची चर्चा होती,आपण ऐकत होतो. 30 तारखेच्या आदेशामध्ये बदली संदर्भात माझे नाव नव्हते.मी रिलॅक्स होतो. क वर्गात महापालिका येण्यासाठी शासनाकडे अहवाल दिला होता. त्यात शासनाने उत्पन्न कसे वाढविणार कोणत्या योजना भविष्यात घेणार याची माहिती मागितली ती माहिती डिटेल्स दिली होती. आता ड मधून क वर्गात महापालिकेचे नाव आले ही चांगली बाब आहे.पत्रकारांना संमातंर योजने बाबत माहित देत असतांना बदली झाल्याचा ईमेल बघीतला सचिव दर्जावर माझे प्रमोशन झालेलेच आहे,आम्ही शासनाचे अधिकारी आहोत शासन आदेश देईल त्याप्रमाणे काम करावे लागते.बदलीची ऑर्डर आली थोडे बरे ही वाटले कारण नागपूर मध्ये माझे शिक्षण झाले या शहरासाठी काही तरी करावे अशी फार दिवसापासूनची इच्छा होती.या शहरात एन आय टी चे चेअरमन म्हणून पोस्टीग झाली प्रशासकीय नोकरीमध्ये काम करतांना नवनवीन खात्याची पोस्टींग मिळाल्यास अनुभव हा मोठा होत जातो.समांतर लाईनचे काम या शहरासाठी आपण करू शकलो. किती आरोप होत असलेतरी ही योजना सर्वाच्या सहकार्याने राबविण्यात आली.त्याबध्दल व्यक्तीगत मी समाधानी आहे.जेंव्हा आयुक्त म्हणून रूजू झालो,तेव्हा असे कळले की 3-4 दिवसानंतर पाणी पुरवठा होतो. समांतर लाईनच्या विरोधात आयुक्त आहे असे म्हटले गेले परंतु ही सर्व प्रक्रिया निमयाप्रमाणे व्हायला पाहिजे,ही एक इन्स्टीटयूट आहे नुकसान होवू नये हे माझ्यासाठी महत्वाचे होते.माझ्या अनुभवानुसार पुरेपुर या योजनेसाठी प्रयत्न केला संस्थेचे महत्व वाढविण्याचाच प्रयत्न केला कुठेही गालबोट लागू नये. याची दखल घेतली.जाणीवपुर्वक चुका झ ालेल्या नाही.मनपाचे नुकसान होणार नाही याची दखल घेतली.अधिकारी कर्मचारी यांनी दीड वर्ष चांगले सहकार्य दिले.काही अधिकारी एखादया कामात कमी असतात,काहींना लगेच ते काम कसे आहे समजते. जास्त वेळ देणारे अधिकारी/कर्मचारी येथे आहे.किरकोळ चुका होतच असतात त्यांना सुधारण्याची संधी दिली पाहिजे माफ करायला पाहिजे जर जाणीवपुर्वक कुणी चुका करीत असेल तर कार्यवाही होणे सुध्दा अपेक्षीत असते.रस्त्याच्या संदर्भात नेहमीच बातम्या येत असे शहरात अनेक रस्त्यावर खड्डे पडलेले दिसायचे त्यामुळे सर्वाचीच बदनामी होत असे. यासाठी सर्व पदाधिकारी प्रशासन मिळून बैठक घेतली,टॅक्स चाजेस

वाढविण्याचे ठरले त्यानंतर व्हाईट टॅपींग रस्ते करण्याचे ठरविले. मध्यतंरी आर्थीक टंचाई मूळे कामे थांबून ठेवली होती. उत्पन्न किती,खर्च किती होणार आहे याची जाणीव ठेवूनच काम करायला पाहिजे.स्पील ची कामे व्हावी असा बजेटमध्ये निर्णय घेतला त्यानुसार 1-2 सचिंका प्रलंबीत असतील.स.सदस्य श्रीमती शिंदे यांनी सांगीतले त्यांचे वार्डातील 80 लक्षचे बजेटमधील काम डिलीट झाले अशा वेळी त्या भागात 30 लक्ष पर्यतचे कामे होतील असे म्हटले होते. 1124 कर्मचा-याच्या बाबतीत 2 टिम नियुक्त केल्या आहे 50-60 कर्मचा-याच्या ऑर्डर देणे बाबत आदेशीत केले. 265 कर्मचारी बाबतीत डायरेक्शन देवून कार्यवाही करण्याचे आदेशीत करतो. सुट्टीच्या दिवशीचा सफाई कर्मचा-यांचे पेमेन्ट देणे बाबत आदेश काढले आहे.सात आठ विभागाचे कर्मचारी त्यात आहे गार्डन मधील कर्मचारी यांना पेमेन्ट देणे बाबत टेंडर प्रोसेस करून कार्यवाही करावी लागणार आहे.टॅक्सेसच्या माध्यमातून उत्पन्न वाढले. पुढेही असा प्रतिसाद मिळावा.स्वतःहून टॅक्स भरणारांची संख्या कमी आहे नागरीकांना सवय लागली पाहिजे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.मा.हायकोर्टचे जेंव्हा धार्मीक स्थळ व त्यानुसार रस्ते चांगले होण्या संदर्भात आदेश झाले त्यानुसार सर्वांना एकत्रीत बोलवून सामजस्याने चर्चा करून कुठेही गालबोट न लागता तो प्रश्न सोडविला.समांतर योजना ही जनतेसाठी राबवित आहोत त्याच बरोबर ड्रेनेज (गटार) योजना नव्याने हाती घेतली त्यासाठी 450 कोटी खर्च होणार आहे.व्हाईट टॅपींगचे रस्ते हाती घेतले त्यात प्रामुख्याने क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता पुर्णत्वाकडे आहे.एलईडी लाईट लावण्या बाबतचा प्रस्ताव आजच्या बैठकीला आहे. माझ्या मते शहरासाठी ज्या मुलभुत सुविधा दयायला पाहिजे त्यासाठी आपण सर्वानी मिळून चांगले पाऊल उचलले आहे.याचे श्रेय सर्वांना तसेच प्रशासनाला मिळते.अशी कामे होण्यात प्रशासनाला आनंदच आहे.चांगले काम करण्याची संधी मला उपलब्ध करून दिली याचे समाधान मला आहे.शाळेचा दर्जा सुधारण्याकडे विशेष लक्ष दिले.नॅशनल अर्बन हेल्थ मिशनच प्लॅनींग औरंगाबाद साठी मंजूर झाले त्यानुसार 5 हॉस्पीटल नवीन तयार होणार आहे.मनपाच्या शाळाकडे विषेश लक्ष दिले कुणाचीही प्रगतीकडे वाटचाल होणे हे मोठे काम आहे.शिक्षकामध्ये विश्वास निर्माण करू शकलो.यापुढेही ते टिकून रहावे अशी अपेक्षा आहे.उत्पन्न वाढविण्या करीता कर्मचारी काम करीत असतांना त्यांना सपोट करावा या महापालिकेतील सर्व अधिकारी कर्मचारी यांचे व पत्रकारांचेही सहकार्य लाभले पेपर न्यूज मुळे विकास कामाचे प्लॅनींग प्रोसेस करणे,कामात गती देण्या मध्ये मदत होते.आजही विविध योजनेच्या माध्यमातून 1500 कोटीची कामे शहरात चालू आहे.महापालिकेचा दर्जा हा शासन आदेश येण्या आधीच वाढलेला होता त्या अधारे शासनाने ड वर्ग मधून क वर्गाचा दर्जा देवून शिक्कामोर्तब केले. जेथे माझी बदली झाली ती एनआयटी संस्था आहे ही संस्था अशी आहे की,राज्यात कुठेही काम करण्याचे अधिकार या संस्थेला आहे.या संस्थेच्या माध्यमातून महापालिकेसाठी काही करता आले तर चांगलीच बाब आहे सर्वांचे सहकार्य मला लाभले त्याबध्दल सर्वांचे अभिनंदन.

श्री.मीर हिदायत अली :गणेश कॉलनी व्हीआयपी रस्त्यावर महापालिकेचे रूग्णवाहिनी (ॲम्ब्युलंस) या वाहनाने सय्यद अली नावाचे इसमास जोरदार धक्का दिल्याने ते गंभीर जखमी झाले. त्याचे घरची परीस्थिती अत्यंत गरिब असून त्यांना उपचारासाठी आर्थीक

मदत करावी. तसेच त्याचे कुटूंबातील एका व्यक्तीस साफसफाई मजूर किंवा शिपाई पदावर मनपा सेवेत समावेश करून घ्यावे या बाबत कार्यवाही करावी.

मा.सभापती :या बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.आता विषय पत्रिका घेण्यात येते.

**विषय क्र. 67 : कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.02 मधील भगतसिंगनगर रस्ता ते म्हसोबा मंदिर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013-14 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.48,52,126/- चे होत आहे. सदरील कामाचा खर्च मंजुर रेखाकंनात मुलभुत सुविधा पुरविणे या लेखाशिर्ष अंतर्गत करणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्यात येते.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.48,52,126/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.67 मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.02 मधील भगतसिंगनगर रस्ता ते म्हसोबा मंदिर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.48,52,126/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 68 : कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.02 मधील जळगाव रोड ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2011-12 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.36,73,201/- चे होत आहे. सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत करणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्यात येते.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.36,73,201/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.68 मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.02 मधील जळगाव रोड ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.36,73,201/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 69 :**

**(अ)** औरंगाबाद शहरातील पथदिव्यांचे नुतनीकरण करुन बिओटी तत्वावर एलईडी फिटींग लावण्याच्या कामाची निविदा सुचना प्रसिध्दीस दिली असता आठ निविदांची विक्री झाली व तिन एजन्सीने निविदेचा भरणा केला, त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

1. मे. इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम्स प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (जॉईंट व्हेंचर)
2. मे. पॉलीकॅब वायर्स प्रा. लि.

3. मे. शहा इन्व्हेस्टमेंट फायनान्सीएल डेव्हलपमेंट ॲन्ड कंन्स्ट्रक्शन कं. लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्राजेक्टस् प्रा.लि. (जॉईंट व्हेंचर)

उपरोक्त तिन निविदाधारकांनी निविदेसोबत दाखल केलेले Technical Bid आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीसमोर दिनांक 28.08.2014 रोजी उघडण्यात आले. या तिन्हीही निविदा धारकांच्या तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असता,मे.पॉलीकॅब वायर्स प्रा.लि. व मे.शहा इन्व्हेस्टमेंट फायनान्सीएल डेव्हलपमेंट ॲन्ड कंन्स्ट्रक्शन कं.लि. यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार फिलीप्स, बजाज, क्रॅाम्प्टन किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य मान्यता प्राप्त एलईडी फिटींगचे कागदपत्र सादर केलेले नाही. त्यामूळे त्यांच्या निविदेचा विचार करण्यांत आला नाही.

तसेच उपरोक्त सर्व कंत्राटदारांचे एल.ई.डी. दिव्यांचे (Fixtures) नमुने (Sample) निविदा अटी नुसार शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालयाच्या लॅबमध्ये तांत्रीक तपासणीसाठी पाठविण्यात आले. मे.इलेक्ट्रॅान लायटींग सिस्टीम्स प्रा. लि. यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार एलईडी पथदिव्यांचे नमुने (Sample) सादर केल्याने त्यांच्या फिटींगची लॅबमध्ये व प्रत्यक्ष साईटवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यायालयामार्फत तांत्रिक तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मे.इलेक्ट्रॅान लायटींग सिस्टीम्स प्रा.लि. यांनी सादर केलेल्या फिटींगचा तांत्रिक अहवाल निविदेच्या अटी व शर्तीनुसार असल्याचे निदर्शनास आले.

मे. इलेक्ट्रॅान लायटींग सिस्टीम्स प्रा. लि. यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्याने तसेच त्यांची एलईडी फिटींग ही सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), महाराष्ट्र राज्य यांची मान्यता प्राप्त असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | • Project cost of PART A of Abstract of Estimate<br>• (एकुण 40,000 नग एल.ई.डी. दिव्यांची किंमत) | • Rs. 86,93,17,400/- |
| 2. | • Project cost for PART B of Abstract of Estimate.<br>• (इन्फ्रास्ट्रक्चर ची किंमत) | • Rs. 25,28,50,680/- |
| 3. | • Total (Part A + Part B) (1 + 2)<br>• (Total Project cost) | • Rs. 112,21,68,080/- |
| 4. | (a) BOT Period | • Months 96 |
| | (b) Preparatory period offered | • Months 3 |
| 5. | • EMI offered for the BOT period towards recovery of payments for work covered in the scope of PART A & PART B of Abstract of Estimates (Inclusive of all taxes & duties applicable on the date of Tender opening) | • Rs. 2,72,00,000/- |
| 6. | • Cost of AMC for PART A & PART B for the BOT Period = (4) x (5) | • Rs. 261,12,00,000/- |
| 7. | • Cost of AMC for PART C<br>• Total Electricity Bill for 10 Years. | • Rs. 44,57,92,896/- |
| 8. | • Cost of AMC for Part D (वर्ष 9 व वर्ष 10 साठी LED च्या दिव्यांची (Fixtures) देखभाल दुरुस्तीसाठी) | • Rs. 9,12,00,000/- |
| | • Total cost of AMC for evaluating the lowest Bidder = (6) + (7) + (8) | • Rs. 314,81,92,896/- |

**(ब)** शिवाय सदर मे. इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम्स प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (जॉईंट व्हेंचर) यांनी असाही प्रस्ताव दिला आहे की, पथदिव्यांच्या ऑन लाईन इंटरनेट बेसड कंट्रोल आणि मॉनिटरींग सिस्टीम साठी जी काही यंत्रणा आणि जी.एस.एम.(GSM) वर आधारीत मोडेम जे पथदिव्यांचे बंद-चालु करण्याबाबत संचलन करेल अशी यंत्रणा प्रत्येक कन्ट्रोल पॅनलमध्ये त्यांचेतर्फे विनामुल्य बसविण्यात येईल. त्यासाठी कंट्रोल पॅनेल्सची संख्या जी भाग-बी मध्ये दर्शविली आहे, ती गरजेनुसार कमी करण्याची परवानगी/मुभा संबंधीत कंत्राटदाराने मागितली आहे. त्यानुसार मान्यता देणेस हरकत नाही. त्यासाठी मे.इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम्स प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Vencture) यांनी पथदिव्यांवर जाहिरातीचे हक्क मागितले आहेत. सदर प्रस्ताव देखील चांगला असून, शहर सौंदर्यीकरण आणि पथदिव्यांच्या Online control system साठी वेगळा खर्च न करता हे काम मार्गी लागण्याच्या दृष्टीने फायद्याचा प्रस्ताव आहे.

**(क)** तसेच संबंधीत कंत्राटदार यांनी दुसरा प्रस्ताव दिला आहे की, सदर निविदेत कॉप्रेहेन्सीव मेंटेनन्ससह 8 वर्षे BOT Period आणि पुढील दोन वर्ष (भाग-D) सशुल्क Comprehensive maintenance कंत्राटदार करणार आहे. या दोन वर्षात प्रती फिक्स्चर रुपये 95/- प्रतीमाह असा दर कंत्राटदाराने दिला आहे. त्यांनी आणखी पुढील दोन वर्षांसाठी (वर्ष 11वे आणि वर्ष 12वे) याच दराने म्हणजेच रुपये 95/- प्रतीमाह प्रति फिक्स्चर दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. त्यास देखील मान्यता देणेस हरकत नाही.

अशा प्रकारे शहरात एल.ई.डी. पथदिव्यांचा प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर राबविणेसाठी व त्या अंतर्गत विविध वॅटेजचे एकुण 40,000 नग LED पथदिवे लावणे, निविदेच्या भाग-बी मध्ये दर्शविलेले इन्फ्रास्ट्रक्चर चे काम करणे, त्याची 8 वर्षे विनामुल्य देखभाल करणे, यासाठी एकुण रुपये 2.72 कोटी प्रतीमाह 96 महिन्यांसाठी देणे, रुपये 95/- प्रती फिटींग प्रमाणे वर्ष 9 व वर्ष 10 साठी LED पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेच्या प्रस्तावास मान्यता मिळावी. त्याचप्रमाणे उपरोक्त (ब) आणि (क) च्या अतिरिक्त बाबीस देखील मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळी एलईडी पथदिवे बाबतचा प्रस्ताव आहे शहर अभियंता यांनी या बाबत सविस्तर माहिती दयावी.

शहर अभियंता :औरंगाबाद शहरातील पथदिव्याचे सिस्टीमचे नुतनीकरण करून बीओटी तत्वावर एलईडी फिटींग लावण्याचा हा प्रस्ताव आहे.पथदिव्याची सिस्टीम ही पुर्णतःमोडकळीस आलेली आहे.यापुर्वी शहरातील व सिडको भागातील मुख्य रस्त्यामधील पथदिव्याच्या बाबतील कॉम्प्रेसीव मेन्टनसचा प्रयोग केला. त्यात इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रोव्हीजन नसल्यामूळे त्याचा अनुभव घेवून यात ब-याच गोष्टीचा समावेश करून हा प्रकल्प प्रस्ताव ठेवला.येत्या आठ वर्षात हा प्रकल्प राबविणार आहोत. एका वर्षात 40 हजार एलईडी लॅम्प वेगवेगळया वॅटचे लावणार तसेच 25 कोटीचे इन्फ्रॉस्ट्रक्चर करणार त्यात केंबल ,कन्ट्रोल पॅनल, जन्शन बॉक्स, पोल बसविणे असे 25 कोटीचे काम असणार आहे.या निमित्ताने शहरातील संपूर्ण पथदिव्याचे इन्स्फ्रास्ट्रक्चरचे काम होईल.किती निविदा कितीदा मुदतवाढ दयावी लागली सर्व तपशील दिला आहे एकूण 40 हजार नग एलईडी दिवे त्यासाठी 86.93 लक्ष खर्च व एक वर्षाच्या कालावधीत ते दिवे लावणार व पार्ट बीमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर ची किमत 25.28 दिली आहे.पार्ट अे व बी मिळून 112 कोटी लागणार आहे.आठ वर्ष देखभाल दुरूस्ती करणार आहे. तसेच मासिक हप्ता हा 2.72 कोटी असणार आहे.आज रोजी महापालिका एक कोटीपर्यत बील भरते व

40 हजार पथदिवे लावल्यानंतर किती सेव्हींग होणार याची माहिती घेतली 10 वर्षाचे बील जवळपास 44.57 कोटी येईल असे म्हटले. त्यापेक्षा जास्त आल्यास ईएम आय मधून कपात केली जाईल असे नमूद आहे.पथदिवे वेळेवर बंद करणे,चालू करणे तसेच प्रकाशाची क्वॉलीटी संदर्भात टेंडरमध्ये अटी घातलेल्या होत्या. ही सर्व सांगड घालत हा प्रस्ताव सादर केला. दरा बाबत निगोसिएशन करण्या बाबत बोलवले त्यावेळी पथदिवे बाबत ऑनलाईन सिस्टम आहे. ती फ्रि ऑफ कॉस्ट बसून दिले जाईल जेणे करून शहरातील कोणत्या भागातील दिवे बदं चालू आहे हे ऑफिसमध्यून बघता येईल.असे संबधीत एजन्सीने म्हटले नागपूर मनपाने अशा प्रकारची सिस्टमसाठी 56 कोटी खर्च केले. संबधीताने स्ट्रीट लाईटवर जाहिरात लावण्यास परवानगी दिली तर प्रोत्साहन मिळेल असे म्हटले.यात 8 वर्षाचे बीओटी पिरीयेट तसेच 2 वर्षाचे एक्सप्लेडेंड कॉम्प्रेसीव मेन्टनन्स पिरीयड असे 10 वर्षा पर्यंत जवळपास काम बघणार आहे. नवीन एलईडी पथदिव्याचे आयुष्य हे 12 वर्षाचे आहे 9,10,11,12 व्या वर्षीच्या कालावधीत या प्रस्तावानुसार 40 हजार पथदिवे लावणार आहोत. 25 कोटीचे इन्स्फ्रास्ट्रक्चरचे काम व 10 वर्ष देखभाल दुरूस्तीचे काम करणे अशा प्रकारचा प्रस्ताव आहे.व 2.72 कोटी प्रतिमहा देण्याचे प्रस्तावित केले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापुर्वीही 12,15,18 मीटर रस्त्यावर कॉम्प्रेसिव्ह दिवे लावले होते. तो अनुभव आलेला आहे. निश्चित पणे ते काम होतांना टाळाटाळ होत होती. कोणत्या ठेकेदाराकडे कोणत्या रस्त्यावरील लाईटचे काम दिले तेच लक्षात येत नसे.आता या प्रस्तावानुसार 3 मीटर किंवा 24 मीटर रस्ता असेल एकच सिस्टमने काम होणार आहे का?किती पोल चांगले आहे ते वापरासाठी येवू शकतात का? यापुर्वीचे पोल काढले व इतर साहित्य काढल्यानंतर कुठे जायचे कळायला मार्ग नाही.मनपाचे कर्मचारी यांना काय काम देणार, इन्स्फ्रॉक्ट्रक्चर म्हणजे पुर्ण केबल बदलणार का? सध्या केंबल रस्त्यावर दिसून येते.पादचारी यांना त्रास सहन करावा लागतो.विदयुत एनर्जी सेव्हींग होणार का? कॉम्प्रेसिव मध्ये एनर्जी सेव्हींग झालेली नाही मागिल अनुभव लक्षात घेवून चांगल्या प्रकारे अटी शर्ती करारनाम्यात असाव्यात दंडात्मक कार्यवाही करण्या बाबत कार्यवाही असावी.मोठा प्रोजेक्ट आहे.निश्चित पणे महापालिकेचा भार कमी होईल कार्यकाळ किती असणार आहे.हे काम होत असतांना इतर लाईटची वार्डातील कामे कराणार की नाही तसेच 2 वर्षाचा कालावधी दिला तो कमीत कमी असावा.लवकरात लवकर काम करून घ्यावे या प्रस्तावास मंजूरी दयावी.

श्री.त्रिंबक तुपे :गटार,वाटर, मीटर या तीनही गोष्टी महापालिकेने कराव्या व त्या करणे नागरीकाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत.या तीनही योजना राबवित आहोत.याअगोदर अशा कामातून छोटया ठेकेदाराना कामे मिळत असे. परंतु या तीनही योजना राबविल्या गेल्यास महापालिकेचा फायदा होणार आहे. शहरात जुने पोल,पथदिवे लाईट,केंबल निघणार आहे त्याचे काय करणार? याचा उल्लेख यात नाही.पोलवर जी ॲड होणार आहे ती लहान असावी नागरीकांना त्रास होता कामा नये.एनर्जी सेव्हींग असेल, कर्मचा-यांचा विषय असेल,याचा सखोल अभ्यास करून अटी शर्ती कराव्यात.त्याचे पालन व्हावे चांगला प्रस्ताव आहे मंजूरी दयावी.

शहर अभियंता :लाईनमन कर्मचारी 10-15 आहे.त्यांचेकडे ओरली कन्ट्रोलर व सुपरव्हीजनचे ते काम करतील.जुने पोलचे नुतनीकरण करणार आहोत जे सडलेले पोल,लटकलेले वायरींग आहे ते काढून जेथे पोलला आर्थींग नाही ही सर्व कामे 25 कोटीमध्ये इन्फ्रास्ठ्रक्चर मधून करणार आहोत.कामात दिरंगाई वगैरे झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणार आहोत. एक वर्ष कालावधी लागणार आहे.कॉम्प्रेस्विह काम एकदम बंद करणार नाही. जस जसे हे काम होईल तसतसे पुर्वीचे काम कमी करता येईल.वेळेवर प्रेमेन्टसाठी तरतूद केली. काम थांबणार नाही.40 हजार जुने पथदिवे निघणार आहे चालू असलेले दिवे व्यवस्थीत उतरून सुरक्षीत ठेवून जस जसे दिवे जमा होतील त्याचे ऑक्शन करून न.पालिका तहसिल विभाग व ग्रामपंचायत ऑक्शन मध्ये भाग घेवून ते दिवे वापरासाठी घेवू शकतात.

मा.सभापती :शहरातील पथदिव्याचे नुतनीकरन करून बीओटी तत्वावर एलईडी फिंटींग लावण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली निविदा मे.इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम्स प्रा.लि. यांची निविदा, अटी शर्ती पुर्ण करीत असल्याने प्रशासनाने स्थायी समितीसमोर सादर केलेला प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. ऐनवेळचे सर्व विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील पथदिव्यांचे नुतनीकरण करुन बीओटी तत्वावर एलईडी फिटींग लावण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. इलेक्ट्रॉन लायटींग सिस्टीम्स प्रा.लि.(जॉइंट व्हेंचर) यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्याने तसेच त्यांची एलईडी फिटींग ही सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), महाराष्ट्र राज्य यांची मान्यता प्राप्त असल्याने व शहरात एल.ई.डी. पथदिव्यांचा प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर राबविणेसाठी व त्या अंतर्गत विविध वॅटेजचे एकुण 40,000 नग LED पथदिवे लावणे, निविदेच्या भाग-बी मध्ये दर्शविलेले इन्फ्रास्ट्रक्चरचे काम करणे, एल.ई.डी.पथदिव्यांची 8 वर्षे विनामुल्य देखभाल दुरूस्ती करणे, यासाठी एकुण रुपये 2.72 कोटी प्रतीमाह 96 महिन्यांसाठी देणे, रुपये 95/- प्रती फिटींग प्रतीमाह प्रमाणे 9 व्या व 10 व्या वर्षासाठी LED पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेच्या प्रस्तावास स्विकृतीसह सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. त्याचप्रमाणे उपरोक्त प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (ब) आणि (क) च्या अतिरिक्त बाबीस देखील सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदर प्रकल्पाचे काम यशस्वीरित्या पूर्ण व्हावे याकरीता संबंधीत कंत्राटदारास निविदेतील अटी शर्तीप्रमाणे नियमित देयक अदा करावे. यास्तव ठेवण्यात आलेल्या Escrow Account तसेच बँक गॅरंटीची तरतुद निविदेत करण्यात आलेली आहे. त्यासही मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 70 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड-अ कार्यक्षेत्रातील केबल खोदकामामुळे नादुरूस्त झालेल्या रस्त्यांची दुरूस्तीची कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.21,14,666/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यतेनुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आली असता ई-टेंडर विभागाच्या अहवालानुसार एकुण 03 कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | - | 10.12% जास्त दर |
| 02. | के.बी.पाथ्रीकर | - | 13% जास्त दर |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.12% जास्त दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.12% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड-अ कार्यक्षेत्रातील केबल खोदकामामुळे नादुरूस्त झालेल्या रस्त्यांची दुरूस्तीची कामे करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.12% जास्त दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 71 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विकास योजने अंतर्गत वार्ड-अ कार्यक्षेत्रात खालील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अ.प. र.रू. | निविदा दर | कंत्राटदाराचे नांव | कार्यादेश क्रं. व दि. |
|---|---|---|---|---|---|
| 01. | जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शहागंज चमन विकास योजनेनुसार 15 मीटर रूंद रस्त्याचे मजबुतीकरण/ डांबरीकरण करणे. | 40819943/- | 6.13% जास्त | मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | 205 12/04/2012 |
| 02. | औरंगाबाद महापालिका मुख्य प्रशासकीय इमारत ते चेलीपुरा चौक मार्गे लोटाकारंजा विकास योजनेनुसार 15 मीटर रूंद रस्त्याचे मजबुतीकरण/ डांबकरीकरण करणे. | 42669711/- | 6.13% जास्त | मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन | 12/05/2012 |
| 03. | गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजनेनुसार 15 मीटर रूंद रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरण करणे. | 46305270/- | 6.12% जास्त | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन चंद्राम आशन्ना | 214 17/04/2012 |
| 04. | नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई विकास योजनेनुसार 12 मीटर रूंद रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरण करणे. | 18723896/- | 6.13% जास्त | ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन<br>कालीका कन्स्ट्रक्शन | 211 13/04/2012 |
| 05. | महात्मा गांधी पुतळा शहागंज ते मंजुरपुरा चौक 15 मीटर रूंद आणि मंजुरपुरा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय12 मीटर रूंद रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरण करणे. | 23891955/- | 5.10% जास्त | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 08/06/2012 |
| | एकूण- | 172410775/- | | | |

वरील कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रू.17,24,10,775/- इतकी आहे. सदरील कामावर देखरेख करण्यासाठी व कामाची Quantity आणि Quality वेळोवेळी तपासणीसाठी या कामाचे कंसल्टंट म्हणुन

मे.देवगिरी कंसल्टंट यांची नियुक्ती "मे.देवगिरी कन्सल्टंट यांचे बरोबर PMC च्या कामाबाबत पुर्वी डीफर Payment च्या कामासाठी करार झाला आहे. त्याच्या Appendix-A चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, Description of the project या प्रमाणे आहे. The Project consists of the Project Management and Consultancy services for Improvement & Construction of various roads under Aurangabad Municipal Corporation. या तरतुदीच्या आधारे प्रश्नाकीत कामासाठी PMC देवगिरी कन्स्टल्टंट यांना कंत्राटदाराच्या संबंधीत कामाच्या कार्यारंभ आदेशाची प्रत देण्यात आलेली असून सदर कार्यारंभ आदेशातील निर्देशाप्रमाणे PMC देवगिरी कन्स्टल्टंट हे काम करीत आहे. मनपाच्या कामासाठी PMC नियुक्तीच्या मुळ निविदेतील अटीशर्तीपैकी 2.60 Modification या क्लॉज खाली Modification of the scope of services करता येते असे Clause मध्ये नमुद आहे." सदर Clause 2.6 प्रमाणे सदर कामाच्या कार्यारंभ आदेशाची प्रत देवगिरी कंन्सल्टंट यांना PMC म्हणुन देण्यात आली असून त्यानुसार काम करणेचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे ते कामावर देखरेख आणि संबंधीत कामे करीत आहेत. त्यांनी दिलेल्या दरानुसार म्हणजे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.75% व शासनमान्य प्रचलीत Service Tax 12.36% देय राहील. या दराने वरील कामासाठी संबंधीत कंन्सल्टंट यांना यापोटी एकुण रक्कम रू.33,90,114/- (12.36% सर्व्हीस टॅक्स सहीत) इतकी रक्कम अदा करावी लागेल.

तरी उपरोक्त दर्शविलेल्या कामावर देखरेख करण्याकरीता मे.देवगिरी कंन्सल्टंट यांना मुळ निविदेतील ठरलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.75% व 12.36% सेवाकरासह मे.देवगिरी कंन्सल्टंट यांची वरील दर्शविलेल्या कामाकरीता कन्सल्टंट म्हणुन नियुक्ती करणेबाबतचा कार्योत्तर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विकास योजने अंतर्गत वार्ड-अ कार्यक्षेत्रात खालील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेची अ.क्र.01 ते 05 प्रमाणे दर्शविलेल्या कामावर देखरेख करण्याकरीता मे.देवगिरी कंन्सल्टंट यांना मुळ निविदेतील ठरलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.75% व 12.36% सेवाकरासह मे.देवगिरी कंन्सल्टंट यांची वरील दर्शविलेल्या कामाकरीता कन्सल्टंट म्हणुन नियुक्ती करणेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 72 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.32 कबाडीपुरा येथील (तवक्कल फटाका शॉप जवळील) नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.36,72,363/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.164 दिनांक 18/02/2013 अन्वये व सदरील काम मे.अमन असोसिएट्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराने करून घेण्यास मा.स्थायी समिती विषय क्र.141 दिनांक 11/02/2014 अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. मुळ अंदाजपत्रकात अस्तित्वातील आर्च कल्व्हर्ट तसाच ठेऊन त्या लगत 15 मीटर लांब व 7.50 मीटर रूंद पुल बांधण्याचे प्रस्तावीत होते. परंतु सध्या असलेल्या आर्च कल्व्हर्टचे व्हेंट कमी असल्यामुळे त्याठिकाणी नाल्याचा प्रवाहद्वारे वाहुन येणारा गाळ व कचरा यामुळे व्हेंट ब्लॉक होत आहे. तसेच सध्याचा आर्च कल्व्हर्ट हा 15 मीटर रूंद विकास योजना रस्त्यावर तिरकस तसेच अतिशय कमी उंचीचा असल्यामुळे आर.सी.सी. पुल बांधणेसाठी पुलाची Alingment आणि पुलाच्या उंचीबाबत तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत.

करीता या जागेवरील जुना कल्व्हर्ट काढून 7.50 मीटर ऐवजी 9.00 मीटर रूंद आर.सी.सी. पुल बांधण्याचे प्रस्तावित असून या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन 2011-12 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.48,86,523/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच सदरील काम मुळ ठेकेदार मे.अमन असोसिएटस यांच्याकडून मंजुर दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराने करून घ्यावयाचे आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.48,86,523/- च्या सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीचा तसेच सदरील काम मुळ ठेकेदार मे.अमन असोसिएटस् यांच्याकडून मंजुर दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराने करून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.32 कबाडीपुरा येथील (तवक्कल फटाका शॉप जवळील) नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधणे या काम सुरू असतांना तांत्रिक अडचणीमुळे जुना कल्व्हर्ट काढून 7.50 मीटर ऐवजी 9.00 मीटर रूंद आर.सी.सी. पुल बांधण्याचे प्रस्तावित असल्याने या कामाकरीता रक्कम रू.48,86,523/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मुळ ठेकेदार मे.अमन असोसिएटस यांच्याकडून मंजुर दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 73 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013-14 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,97,213/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात "प्रो पुअर बजेट" या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या 15.00 कोटीच्या तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.49,97,213/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,97,213/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 74 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती तहसीन बेगम मोहम्मद मुसा, मुख्याध्यापिका, के.प्रा.शाळा, महानगरपालिका औरंगाबाद यांचा मुलगा सय्यद एजाज अहमद यांच्या मेंदुचे कर्करोग या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय डॉ.शंतनु कुलकर्णी कँसर हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून त्या उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना मेंदुचे कर्करोग उपचारार्थ एकुण केलेला खर्च रक्कम रू.9,20,185/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.88,720/- वजा जाता रू.8,31,465/- शिल्लक राहते. शिल्लक रकमेच्या 90% रू.7,48,317/- इतकी होते. एकुण खर्चाचा 5% रक्कम रू.46,009/- ही मनपा फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.7,02,309/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार घेतलेल्या डॉ.शंतनु कुलकर्णी यांचे कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत समाविष्ट आहे. सदरचा प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

संबंधीतास मेंदुचे कर्करोग या गंभीर स्वरूपाचे आजार असून त्यांना निव्वळ देयक असलेली रक्कम जास्त असल्याने त्याची अदायीगी संबंधी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला असून शासन निर्णयाच्या अधिन राहुन रक्कम रू.7,02,309/- अदा करण्यासाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे व शासनाकडून येणाऱ्या निर्णयाचे पालन करणे संबंधीतास बंधनकारक राहील. या अटीच्या अधीन राहून मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

करीता रक्कम रू.7,02,309/- वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम श्रीमती तहसीन बेगम मोहम्मद मुसा, मुख्याध्यापिका, कें.प्रा. शाळा, महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती तहसीन बेगम मोहम्मद मुसा, मुख्याध्यापिका, के.प्रा.शाळा, महानगरपालिका औरंगाबाद यांचा मुलगा सय्यद एजाज अहमद यांच्या मेंदुचे कर्करोग या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय डॉ.शंतनु कुलकर्णी कँसर हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असल्याने, तसेच संबंधीतास मेंदुचे कर्करोग या गंभीर स्वरूपाचे आजार असून त्यांना निव्वळ देयक असलेली रक्कम जास्त असल्याने त्याची अदायीगी संबंधी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला असल्यामुळे, व शासनाकडून येणाऱ्या निर्णयाचे पालन करणे संबंधीतास बंधनकारक राहील, या अटीच्या अधीन राहून श्रीमती तहसीन बेगम मोहम्मद मुसा, मुख्याध्यापिका, के.प्रा.शाळा, महानगरपालिका औरंगाबाद यांना देय असलेली निव्वळ रक्कम रू.7,02,309/- अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 75 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती आशा हरिभाऊ क्षिरसागर सहशिक्षिका के.प्रा.शा. मुकुंदवाडी शिक्षण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी या कार्यालयास विनंती अर्जाद्वारे त्यांचे स्वत:चे आईवर कर्करोगावर कोडलीकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद या ठिकाणी उपचार सुरू असून यावर त्यांना आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती या कार्यालयामार्फत करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात आलेली असून त्यांना कर्करोगाचे उपचारार्थ एकुण रक्कम रू.3,53,790/- इतका खर्च आलेला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.50,059/- वजा जाता रक्कम रू.3,03,731/- शिल्लक राहते शिल्लक रक्कमेच्या 90% रक्कम रू.2,73,358/- इतकी होते. एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.17690/- मनपा फंडात जमा करता संबंधीतास देयक रक्कम रू.2,55,668/- इतकी ठरते. संबंधीतास कार्यालयाकडून आकस्मिक आजाराचे उपचारार्थ रक्कम रू.1,50,000/- अग्रीम प्रदान करण्यात आले होते. व ही रक्कम समायोजन करून एकुण देय रक्कमेमधुन अग्रीम वजा जाता (2,55,668/- -1,50,000/-) = उर्वरीत रक्कम रू.1,05,668/- ही संबंधीतास निव्वळ देय आहे.

संबंधीताने उपचार घेतलेले रूग्णालय शासनाने दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाचे अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरचा प्रस्ताव आरोग्य विभाग महानगरपालिका औरंगाबाद मार्फत पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी शिफारस केली आहे. त्यानुसार सदर वैद्यकीय प्रतिपुर्ती करावयाची रक्कम रू.2,55,668/- ही रक्कम रू.2,00,000/- पेक्षा जास्त असल्याने ती संबंधीतास अदा करणेसाठी मा.स्थायी समिती सभेची मंजुरी आवश्यक आहे.

करीता वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी मान्य रक्कम रू.2,55,668/- मधुन अग्रीम रक्कम रू.1,50,000/- समायोजीत व वजा करून उर्वरीत निव्वळ देय रक्कम रू.1,05,668/- ही श्रीमती आशा हरीभाऊ क्षिरसागर

सहशिक्षिका के.प्रा.शा. मुकुंदवाडी महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती आशा हरिभाऊ क्षिरसागर सहशिक्षिका के.प्रा.शा. मुकुंदवाडी शिक्षण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे स्वत:चे आईवर कर्करोगावर कोडलीकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद या ठिकाणी उपचार सुरू असून खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी दाखल केलेल्या वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी मान्य रक्कम रू.2,55,668/- मधुन अग्रीम रक्कम रू.1,50,000/- समायोजीत व वजा करून उर्वरीत निव्वळ देय रक्कम रू.1,05,668/- श्रीमती आशा हरीभाऊ क्षिरसागर सहशिक्षिका के.प्रा.शा. मुकुंदवाडी महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 76 :**

प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.83 अंतर्गत NS सेक्टर N-4 येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणेच्या कामाचे अ.प. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2013-14 दरसुचीनुसार रक्कम रूपये 27,23,565/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2014-2015 या आर्थिक वर्षात वार्ड ई अंतर्गत विविध विकास कामे या लेखाशिर्षकामधुन करण्यांत येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.27,23,565/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव व विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.83 अंतर्गत NS सेक्टर N-4 येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.27,23,565/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 77 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड-फ महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Portal Hypertension या आजारावर शासन मान्य नसलेल्या Asian Institute of Gastroenterology, Hyderabad. येथे उपचार करावयाचे असून त्यासाठी रक्कम रू.25,00,000/- (रूपये पंचवीस लक्ष) इतक्या वैद्यकीय अग्रीमची मागणी केली आहे.

संबंधीत Asian Institute of Gastroenterology, Hyderabad. हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत अंतर्भुत नाही/ सदर रूग्णालयाचे नांव शासनाच्या यादीत समाविष्ट नाही.

संबंधीतास "Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Portal Hypertension" हा आजार गंभीर असून तातडीच्या उपचाराची गरज असल्याचे संचिकेस संलग्न असलेलया कागदपत्रावरून दिसून येते. संबंधीतास वैद्यकीय अग्रीम / प्रतिपुर्ती देता येईल किंवा कसे? याबाबत शासनास मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून शासन निर्णयाच्या अधीन राहून संबंधीतास रक्कम रू.10,00,000/- पर्यंतची अग्रीम देण्यास मान्यतेस्तव सादर व शासन निर्णयाचे पालन करणे संबंधीतास बंधनकारक राहील, या अटीच्या अधिन राहून मा.स्थायी समितीची मंजुरीस्तव सादर.

करीता रक्कम रू.10,00,000/- (रूपये दहा लक्ष) वैद्यकीय अग्रीम रक्कम श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड 'फ', महानगरपालिका, औरंगाबाद यांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड-फ महानगरपालिका, औरंगाबाद यांना त्यांच्या स्वतःच्या Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Portal Hypertension या आजारावर शासन मान्य नसलेल्या Asian Institute of Gastroenterology, Hyderabad. येथे तातडीच्या उपचारासाठी "शासनास मार्गदर्शनासाठी पाठविलेल्या प्रस्तावावरील शासन निर्णयाच्या अधिन राहुन" रक्कम रू.10,00,000/- (रूपये दहा लक्ष) वैद्यकीय अग्रीम रक्कम श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड 'फ', महानगरपालिका, औरंगाबाद यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.संजय चौधरी :पुढील काही दिवसातच अनेक उत्सव-सण येत आहे.त्यातच गुंठेवारी भागात पाण्याचे टँकर बंद केल्याचे वृत्तपत्राच्या माध्यमातून माहिती मिळाली सत्य परिस्थती काय आहे खुलासा करावा.

शहर अभियंता : टँकर बंद केलेले नाही सर्व भागात पुर्वीप्रमाणेच पाण्याच्या टँकरच्या फे-या चालू आहे.

श्री.खान जहांगिर :कटकटगेट ते पोलीस मेस पर्यंतचे व चंपाचौक ते पुढील सर्व भागातील लाईट बंद आहे बुढीलेन ते सिटीचौक व पुढे रस्त्यामधे लाईटचे पोल केंव्हा हटविणार आहे.तसेच पोलीस मेस जवळ पाणी निचरा करण्यासाठी पाईपलाईन टाकण्यात आली.जेथे अतिक्रमण काढून पॅचवर्क केले होते तेथे मोठे खड्डे पडले .केंव्हा व्यवस्थीत करणार खुलासा करावा.

उपअभियंता(श्री.बनसोडे): पुर्वीची जे लाईटचे काम आहे ते कॉम्प्रेसिव्ह ठेकेदाराकडून करून घेत आहोत. 3-4 दिवसात काम करून घेण्यात येईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(प्रमोद खोब्रागडे)**
नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद